महाराष्ट्र शासन

# जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET), जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था (DATI),

प्लॉट नं.४६,हिस्सा नं.२९,काजरघाटी धार, कुवारबाव, ता.जि.रत्नागिरी.

दूरध्वनी: ०२३५२-३५८२८१ Email:-dietrtn@gmail.com / dietratnagiri@maa.ac.in

जा.क्र.जिशिप्रसंर/शिक्षण परिषद/मित्र उपक्रम /२०२५-२६/ ५८८ दि. ०७.०७.२०२६

सुधारित

प्रति,

१. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती,दापोली ,मंडणगड,खेड

विषय :- मित्र उपक्रमाची अंमलबजावणी करणेबाबत..

संदर्भ:- १) शासन परिपत्रक क्र. संकीर्ण ११ (२९६/११) माशि-३, दि. ५.१०.११ आणि २७/०१/२०१२.

२) मा. आयुक्त (शिक्षण) म.रा. पुणे यांचे पत्र जा. क्र. शिक्षण आयुक्ता / विप, स/२०२०-२१/४३, दि. ०८ डिसेंबर, २०२०

३) विपश्यना विशोधन संस्था (विपश्यना रिसर्च इन्स्टिट्यूट) यांचे पत्र दि. ४/०२/२०२६

४) कक्ष अधिकारी,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय, मुंबई, यांचे पत्र क्रमांक:- संकीर्ण-२०२६/प्र.क्र.७८/एस.डी.४ दि.०८ मे, २०२६

५) मा.संचालक, कार्यालयाचे पत्र SCERT-४६.०/२३/२६-ART&SPORTSI/१८९२८९८/२०२६ दि. १२.०५.२०२६

६) विपश्यना विशोधन संस्था (विपश्यना रिसर्च इन्स्टिट्यूट) यांचे पत्र दि. १८/०५/२०२६.

७) मा.संचालक, विद्या प्राधिकरण, पुणे कार्यालयाचे पत्र जा.क्र.राशैसंप्रपम/कला व क्रीडा / मित्र उपक्रम प्रशिक्षण/सन २६-२७/ दिनांक २५/०५/२०२६.

८) जा.क्र.जिशिप्रसंर/शिक्षणपरिषद/मित्रउपक्रम/२०२५२६/५७३याकार्यालयाचे३०/०६/२०२६पत्र

उपरोक्त संदर्भ क्र. ५ नुसार प्रस्तुत कार्यालयामार्फत मित्र उपक्रमाबाबत निर्देश देण्यात आलेले होते. सदर पत्रामध्ये मित्र उपक्रमांतर्गत राज्यातील अनेक शाळांमध्ये शिक्षक व विद्यार्थ्यांना आनापान साधनेचे अंदाजित २ तासाचे प्रशिक्षण देऊन दररोज १० मिनिटांचा सराव केला जात आहे. तसेच अनेक शिक्षक १० दिवसांचे विपश्यना साधना शिबिरात सहभागी झाले आहेत. यासाठी शासनाने २७ जानेवारी, २०१२ रोजी सविस्तर परिपत्रक निर्गमित करण्यात आले होते. यानंतर वेळोवेळी याबाबत शिक्षण विभागाने परिपत्रके काढून हा उपक्रम राबविण्यात येणाऱ्या अडचणी दूर केल्या आहेत. सदरचा कार्यक्रम राज्यातील सर्व इ.५ वी ते १० वी पर्यंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मानसिक व बौद्धिक वाढीसाठी उपयुक्त ठरणार आहे

संदर्भ क्र. ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मित्र उपक्रमा अंतर्गत ज्या शिक्षकांनी १० दिवसांचा विपश्यना अभ्यासक्रम पूर्ण केलेला नाही त्यांना तीन तासांचे आनापान प्रशिक्षण घेणे संदर्भात निर्देश देण्यात आलेले आहेत **व जिल्हा गुणवत्ता कक्ष बैठकीत समिती सदस्यांनी मान्य केल्यानुसार १००% केंद्रातील १००% केंद्रप्रमुखांचे तीन तासांचे आनापान प्रशिक्षण पूर्ण करून त्यांच्यामार्फत जुलै २०२६ च्या शिक्षण परिषदेत केंद्रातील शिक्षकांना प्रशिक्षण देणे नियोजित आहे, यासाठी केंद्रप्रमुखांचे प्रशिक्षण खालीलप्रमाणेसंदर्भ पत्र ८ नुसार नियोजन करण्यात आलेले होते परंतु काही तांत्रिक कारणास्तव पुढे घेण्यात येणार आहे त्यानुसार कार्यमुक्त करावे.** सदर प्रशिक्षणासाठी कोणत्याही प्रकारचा निधी नाही याची संबंधितांना कल्पना देण्यात यावी.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | १३जुलै २०२६ | धम्म उदक,विपश्यना मेडिटेशन सेंटर दापोली. मु.पिसई जि.रत्नागिरी | मंडणगड,दापोली | १०.३० ते ०१.३०. |
| | | | खेड | ०२.०० ते ०५.०० |

१०० टक्के केंद्रप्रमुखांमार्फत केंद्रातील १०० टक्के शिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण झालेनंतर संदर्भ पत्र क्र ७ नुसार विद्यार्थ्यांचे अंदाजे २ तासांचे प्रशिक्षण घेऊन दररोज १० मिनिटांचा शासन परिपत्रक २७ जाने २०१२ नुसार सराव घेण्यात यावा.

अधिक माहितीसाठी संपर्क क्रमांक:- श्री.संतोष आयरे, विपश्यना, रत्नागिरी ९९७५४३४७५४

सोबत : शासन परिपत्रक.

**(श्री.सुशील शिवलकर )**
प्राचार्य,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
रत्नागिरी.

प्रत माहितीस्तव सविनय सादर

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी

प्रत कार्यवाहीसाठी ...

शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी.

व्यवस्थापक, धम्मपदेस,कोकण विपश्यना मेडिटेशन सेंटर,मु.पाथरट,पो.पाली ता. जि. रत्नागिरी.

व्यवस्थापक,धम्म उदक,विपश्यना मेडिटेशन सेंटर दापोली. मु.पिसई जि.रत्नागिरी.

प्राचार्य, फार्मसी कॉलेज डेरवण फाटा, सावर्डे.